श्रेणणक मा क्र 366


# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महिविद्यालय अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२ ४०५

Phone : (02133) 230582
E-Mail – gcoeara@gmail.com
Fax : (02133) 230583
Website: www.gcoeara.ac.in


जा.क्र. शाअवसंमअ/भांडार/3728

दि. 26 SEP 2019

प्रति,
नोटीस बोर्ड

विषय: संस्था आवारातील गवताची विक्री करणेबाबत.

या संस्थेच्या सुमारे ५० एकर अवारातील गवत काढून अनावश्यक झाडे तोडून टाकणे व काढलेले तण / गवताची विक्री करावयाची आहे. यामध्ये संस्थेचा मुख्य परिसर, मुलींचे वसतीगृह परिसर याचा समावेश आहे. इच्छुक खरेदीदारांनी संस्थेच्या परिसरातील गवताची पहाणी करून दि. ०८-१०-२०१९ पूर्वी संस्थेमध्ये निविदा सादर करावी. निविदा खालील अटींच्या अधीन राहून मागवण्यात येत आहेत.

१. ज्यांची निविदा अधिकतम दराची असेल अशी निविदा मान्य करण्यात येईल व त्यांनी सदरचे काम वर्क ऑर्डर दिल्यानंतर ३० दिवसात पूर्ण करायचे आहे. तसेच त्यांना डिसेंबर २०१९ अखेर पुन्हा एकदा गवत कापून नेण्याची परवानगी देण्यात येईल.

२. गवत खरेदीची संपूर्ण रक्कम वर्कऑर्डर निघाल्यानंतर संस्थेत अगोदर जमा करावी लागेल. त्यानंतरच गवत कापून नेता येईल.

३. गवत कापून नेण्यासाठीचा खर्च महाविद्यालय देणार नाही याची नोंद घ्यावी.

४. गवत कापून घेताना परिसरातील इतर वृक्षांना कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.

५. गवत काढताना सर्व प्रकारची गवत, इतर जंगली रोपे, वृक्षांच्या अनावश्यक फांद्या इत्यादी अशी सरसकट कटाई करणे बंधनकारक असेल.

६. गवत काढणाऱ्या कर्मचाऱ्याना काम करताना कोणतीही इजा झाल्यास अथवा दंश झाल्यास त्याची जबाबदारी संस्थेची राहणार नाही; तर संपूर्ण जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

26/09/19

(डॉ. अ. शि. पंत)
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन
महाविद्यालय अवसरी (खुर्द).

o/c